## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ ची जबानी

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | - | रमेश राजाराम रोठे, |
| माझे वय | - | ६५ वर्षे, |
| व्यवसाय | - | शेती |
| राहणार | - | मुंडगाव ता. अकोट जि. अकोला. |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती.के.जे.महाजन यांचे मार्फत.**

**१.** मी फिर्यादीला ओळखतो. मी आरोपीला ओळखतो. तो न्यायालयात हजर आहे. घटना दि. २६.१०.२०१५ रोजी घडली होती. त्यादिवशी मी ७ ते ७.३० चे दरम्यान सोपान भिसेच्या पत्नीच्या मयतीसाठी लामकाणी येथे गेलो होतो. मी माझ्या मोटरसायलने गेलो होतो. माझ्यासोबत फिर्यादी होता. माझ्या गाडीचा नोंदणी क्र.एमएच ३०-८५८२ असा आहे. आम्ही ८ ते ८.३० च्या दरम्यान लामकाणी येथुन मुंडगाव येथे परत येत होतो. लामकाणी ते मुंडगावच्या मध्यभागी कार्नरवर अंबळकारच्या शेताजवळ एक गाडी आम्हाला धडकली. सदर गाडी मुंडगावरुन लामकाणीच्या दिशेने भरधाव वेगात येत होती. धडकेमुळे आम्ही रस्त्याच्या खाली ५ ते ७ फुट अंतरावर पडलो. पडल्यामुळे माझ्या उजव्या पायाच्या अंगठयाला, तळपायाला व बोटांना मार लागला होता. तसेच टोगळयाच्या खाली पायाला मार लागला होता व चार टाके पडले होते. फिर्यादीच्या उजव्या पायाच्या आंगठयाला व बोटांना मार लागला होता. ज्या गाडीने आम्हाला ठोस मारली त्या गाडीचा क्र.एमएच ३० एके-४०५१ असा होता. आम्हाला ठोस मारल्यावर सदर गाडी निघुन गेली होती. त्यानंतर मी माझ्या मुलाला फोन करुन घटनास्थळावर बोलावले. तसेच फिर्यादीने त्याच्या मुलाला फोनकरुन घटनास्थळावर बोलावले. तेथुन आम्हाला मुंडगाव येथे स्टॅन्डवर आणि नंतर पोलीस ठाण्यात आणले होते. तेथे फिर्यादीने आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला होता. घटनास्थळावर घटनेच्या वेळी आरोपीचा मित्र होता. त्याने आम्हाला ठोस देणाऱ्या गाडी चालकाचे नाव संतोष वानखडे रा. पिपंळखुटा असल्याचे सांगीतले होते. पोलीसांनी आम्हाला नंतर सरकारी दवाखान्यात पाठविण्यात आले. तेथे प्राथमीक उपचार झाल्यावर आम्हाला अकोला येथे खान डॉक्टर यांच्याकडे उपचारासाठी नेण्यात आले होते. तेथे मी व फिर्यादी तिन दिवस भरती होतो. त्यानंतर तिन दिवसांनी आम्ही घरी आलो. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन माझे बयाण नोंदविले होते. खान डॉक्टरांकडे उपचार घेतल्याचे कागदपत्र मी पोलीसांना दिले नव्हते.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री.ए.एस.वैराळे यांचे मार्फत.**

२. असे घडले नाही की माझ्या मालकीच्या गाडीचा क्रमांक मी पोलीसांना एमएच

३०-८५५२ असा सांगीतला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की रात्रीच्या वेळी समोरच्या गाडीचा लाईट डोळयावर पडल्यास समोरचे स्पष्ट दिसत नाही. माझ्या दुचाकीचा क्रमांक एमएच ३०-८५८२ असल्याचे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगीतले होते. सदर क्रमांक पोलीसांनी माझे बयाणात का लिहला नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. तसेच ठोस मारल्यामुळे आम्ही रस्त्याच्या खाली ५ ते ७ फुट अंतरावर पडलो होतो ही बाब मी पोलीसांना बयाण देतेवेळी सांगीतली होती. सदर बाब माझ्या बयाणात का नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. ज्या गाडीने आम्हाला ठोस मारली त्या गाडीवर तिघेजन बसलेले होते काय ते मला दिसले नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनेच्या वेळी मला समोरचा गाडी चालक व गाडीचा क्रमांक दिसला नाही. घटनेच्यावेळी घटनास्थळावर आरोपीचा सोबती होता, त्याने आम्हाला ठोस देणाऱ्या वाहना चालकाचे नाव संतोष वानखडे रा. पिपंळखुटा असल्याचे सांगीतल्याचे मी पोलीसांना बयाण देतेवेळी सांगीतले होते. सदर बाब माझे बयाणात का नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर एल आकाराचे वळण आहे. हे म्हणणे खरे आहे की त्यामुळे समोरुन येणारे वाहन एकदम समोर असल्याशिवाय दिसत नाही. माझ्या मालकीच्या गाडीचे कागदपत्र मी पोलीसांना दिले नव्हते अथवा त्यांनी माझेकडे मागीतले नव्हते. असे घडले नाही की पोलीसांनी माझे बयाण घटनेनंतर एक महिन्यांनी म्हणजेच दि. २९.११.२०१५ रोजी नोंदविले होते. हे म्हणणे खरे नाही की माझी गाडी फिर्यादी भरधाव वेगात चालवित होते. हे म्हणणे खरे नाही की त्यांना कार्नरवर गाडी सांभाळली गेली नाही व आम्ही रस्त्याच्या खाली येवुन पडलो. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी समोरुन येणाऱ्या ज्या गाडीचा लाईट आमच्या डोळयावर पडला त्याचा आम्हाला राग आला. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे आम्ही गावात चौकशी केल्यावर लोकांनी आम्हाला आरोपीचे चुकीचे नाव सांगीतले व आम्ही त्याचे विरुध्द खोटा रिपोर्ट दिला. असे घडले नाही की आम्ही आरोपीला घेवुन मुंडगावला घेवुन गेलो होतो. असे घडले नाही की मुंडगाव येथे आरोपीने त्याचे नाव आम्हाला स्वतः सांगीतले होते. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळावर गाडीच्या हेडलाईट शिवाय प्रकाशाचे दुसरे कोणतेही साधन नव्हते. हे म्हणणे खरे नाही की गावातील लोकांनी सांगीतलेल्या चुकीच्या नावावरुन मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की घटनास्थळावर आरोपीचा मित्र भेटल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या गाडीच्या जवळुन जाणारी गाडी दुसरीच कोणाचीतरी होती. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by BHANUPRATAP B. CHOUHAN
Date: 2023.10.05 18:17:14 +0530

दि. ५/१०/२०२३.
अकोट

भानुप्रताप ब. चौहान
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं.१